|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University Jalgaon
A+ Grade NAAC Re-Accredited (4th Cycle)

संलग्नता विभाग

जा.क्र.कबचौउमवि/५/ संलग्नता/३२५/२०२६ दि. १३/११/२०२६

प्रति, **अत्यंत महत्वाचे**
कबचौउमविशी संलग्नीत सर्व विधी महाविद्यालयांचे
मा.प्राचार्य व अध्यक्ष यांना .....

विषय :- विधी महाविद्यालयांना सन २०२७-२८ ते २०२९-३० या तीन वर्षांची संलग्नता देणेबाबत...
संदर्भ :- ०१)भारतीय विधिज्ञ परिषदेचे दि. २०/०३/२०२५ चे परिपत्रक
०२) मा. विद्या परिषदेचा ठराव क्र. वि.प.सी.-५५/२०२६ दि. १८/०८/२०२६
०३) मा.अधिष्ठाता मंडळाचा ठराव क्र. बी.ओ.डी. ए-१२०-२०२६ दि.१६/१०/२०२६ रोजीचा ठराव

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भिय परिपत्रक व ठरावांच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, भारतीय विधीज्ञ परिषदेच्या निर्देशानुसार Bar Council of India आणि विद्यापीठ यांच्यात एकसूत्रता येण्यासाठी विधी महाविद्यालयांना तीन वर्षीय संलग्नता द्यावी असे सूचित करण्यात आलेले आहे. सदरचा विषय मा.विद्या परिषदेच्या दि. १८/०८/२०२६ रोजीच्या सभेत सादर करण्यात आला असता. विद्या परिषदेने ठराव पारित केलेला आहे की, भारतीय विधीज्ञ परिषदेचे (BCI) संलग्नता ही तीन वर्षाकरीता एकत्रित असते.विद्यापीठाने देखील तीन वर्षाकरीता संलग्नीकरण विधी महाविद्यालयांना द्यावे, यानुसार सदरचा विषय मा.अधिष्ठाता मंडळाच्या सभेत सादर करण्यात आला असता, अधिष्ठाता मंडळाने खालीलप्रमाणे ठराव पारित केलेला आहे.

विधी महाविद्यालयांना BCI च्या निर्देशान्वये एका शैक्षणिक वर्ष ऐवजी तीन शैक्षणिक वर्षाचे संलग्नता शुल्क घेवून त्रैवार्षिक संलग्नीकरण देण्यात यावे. सदर तीन वर्षाच्या संलग्नीकरणाच्या कालावधीत सुरु असलेले अभ्यासक्रम बंद करता येणार नाहीत व भरलेले संलग्नता शुल्क परत मागणी करण्यात येणार नाही असे रु. ५००/- च्या स्टॅम्प पेपरवर संस्थेचे अध्यक्ष, सचिव यांच्या स्वाक्षरीने हमीपत्र नोटरी करुन घेण्यात यावे.

उपरोक्त बाब विचारात घेता, कबचौउमविशी संलग्नीत विधी महाविद्यालयांनी सन २०२७-२८ या वर्षाकरीता संलग्नता शुल्क विद्यापीठात जमा केलेले आहे. तरी उर्वरित दोन वर्ष म्हणजेच सन २०२८-२९ आणि सन २०२९-३० करीता आवश्यक संलग्नता शुल्क ऑनलाईनव्दारे ***दि. २० नोव्हेंबर २०२६*** पर्यत जमा करावे, ही विनंती. जेणेकरुन स्थानिक चौकशी समितीमार्फत तपासणी करुन तीन वर्षाची संलग्नता देण्याची कार्यवाही दि. ३१ डिसेंबर २०२६ पूर्वी विद्यापीठास करणे सोयीचे होईल.

आपला विश्वासू,

(डॉ. विनोद पी. पाटील)
कुलसचिव

प्रत:-
०१) मा.प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
०२) मा.कुलसचिव कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
०३) मा.वित्त व लेखाधिकारी, कबचौउमवि, जळगाव